जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा, दिनांक २/०७/२०१८

## "पोलीस अधिकारी,कर्मचारी यांचेवर अवैध वाळु तस्करी करणाऱ्यांचा हल्ला"

दिनांक ०१/०८/२०१८ रोजी यातील सहा. पोलीस निरीक्षक, बबन रामदास पुसाटे, स्थागुशा, भंडारा हे आपले सहकारी कर्मचारी यांचे सोबत शासकीय गाडी एम.एच. ३६/२२२५ ने पोलीस ठाणे मोहाडी परीसरात नाईट पेट्रोलींग करीत असता ग्राम रोहा (बेटाळा) रेल्वेगेट जवळ उप प्रादेशिक परीवहन विभागाकडुन नोंदनी न केलेले दोन ट्रॅक्टर, त्यांचे ट्रॉलीमध्ये अवैद्यरित्या रेती भरून वाहतुक करतांनी मिळाल्याने सदर दोन्ही ट्रॅक्टर त्यांचे चालकांसह व त्यावर असलेले मजुर यांना सहा. पोलीस निरीक्षक, पुसाटे व त्यांचे सोबत असलेल्या सहकार्यांनी कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता त्यांचे ताब्यात घेवुन त्याठिकाणावरून पो.स्टे. मोहाडी येथे घेवुन जात असता यातील ट्क्टर चालक व त्यांचे सोबत असलेले मजुर यांनी गैरकायदयांची मंडळी जमवुन ट्रॅक्टर कार्यवाही करीता पोलीस ठाणे मोहाडी येथे नेत असता. त्यास अडवुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन पोलीस हवालदार सधिर मडामे/३३० यांना जिवे मारण्याचे उद्देशाने डोक्यावर लोखंडी रॉड मारून जख्मी केले त्यास सहा. पो. नि. पुसाटे हे प्रतिकार करण्यास जात असता यांचा त्यातील एकाणे जिवेमारण्याचे उद्येशाने गळा दाबुन मारण्याचा प्रयत्न केले तसेच पोशि. चेतन पोटे/१३५३ यांचे हातावर लोखंडी रॉड मारुन जख्मी केले व सोबत असलेले लोकांनी दगड फेक करुन शासकीय पोलीस जिप क्रमांक एम.एच. ३६/२२२५ चे काच फोडुन नुकसान करुन पोलीसांचे ताब्यातुन बळजबरीने एक ट्रॅक्टर रेतीसह व दुसरा ट्रॅक्टर रेती जागेच खाली करुन चोरी करुन पळवुन नेल्याने सहा. पो. नि. बबन पुसाटे, सीनिक गुन्हे शाखा, भंडारा यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे मोहाडी येथे अप क्रमांक ११२/१८ कलम ३०७, ३९५, ३९७,३३२,३७९,३५३,३४१,१४३,१४४,१४७,१४८,१४८,१४९,४२७ भांदवि. सहकलम ३ महाराष्ट्र मालमत्ता नुकसान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन जख्मी झालेले पोलीस अधिकारी कर्मचारी सामान्य रूग्णालय, भंडारा येथे उपचार करीत आहेत. गुन्हात फरार असलेले आरोपींचा पोलीस शोध करीत आहेत.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.